सकाळ

# श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी (रजि.क्र.ए-७०८)

## श्री क्षेत्र जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे

## जाहीर निविदा

श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी न्यासातर्फे खालीलप्रमाणे जाहीर निविदा मागविण्यात येत आहेत :

१) **'श्री खंडोबा गड पहिली पायरी ते जुनी घोड्याची पागा परिसर फोटोग्राफी'** व्यवसायासाठी लिव्ह अँड लायसन्स तत्त्वावर देणेबाबत.
(टीप- सदरील टेंडरच्या मासिक रकमेची मर्यादा ही रु. २१ हजार ९६१ रुपयेपेक्षा जास्त असणे अनिवार्य असून, तेच टेंडर विचारात घेतले जाईल.)

२) **'श्री खंडोबा मंदिर महाद्वार पायरी मार्गावरील पिंपळाची वेस परिसरात फोटोग्राफी'** व्यवसायासाठी लिव्ह अँड लायसन्स तत्त्वावर देणेबाबत.
(टीप- सदरील फोटोग्राफी टेंडरच्या मासिक रकमेची मर्यादा ही रु. ३३ हजार ३३३ रुपयेपेक्षा जास्त असणे अनिवार्य असून, तेच टेंडर विचारात घेतले जाईल.)

**अ.क्र.१ व २ करिता नियम व अटी -**

१. निविदा फॉर्म जमा केलेली संस्था/ व्यक्ती निविदा फॉर्म खोलते/ उघडतेवेळी कोणतीही पूर्वकल्पना न देता उपस्थित नसल्यास सदरचा फॉर्म प्रक्रियेतून बाद करण्याचा अधिकार विश्वस्त मंडळाने राखून ठेवलेला आहे.
२. निविदा भरणेकामी फॉर्म फी रु. ५००/- देवसंस्थान कार्यालयामध्ये जमा करून रीतसर पावती घ्यावी.
३. इच्छुक टेंडरधारकांनी आपल्या निविदा दि. १४-०७-२०२५ ते दि. २०-०७-२०२५ पर्यंत स.१० ते सायं. ५ या वेळेत खालील पत्त्यावर जमा कराव्यात.
४. निविदा उघडणेबाबत दिनांक व वेळ ई. निविदाधारकास कळविण्यात येईल.
५. सदरील निविदा देवसंस्थानचे अधिकृत संकेतस्थळ **www.khandoba.com** येथे उपलब्ध आहे.
६. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे किंवा निविदेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे अधिकार विश्वस्त मंडळाने राखून ठेवलेला आहे.

**३) श्री खंडोबा मंदिर गडकोटातील तेल विक्री ठेका ११ महिने लिव्ह अँड लायसन्स तत्त्वावर देणेबाबत.**

**अ.क्र. ३ करिता नियम व अटी :**

(१) टेंडर फॉर्म श्री मार्तंड देवसंस्थानच्या **'मल्हार'** भक्तनिवास येथील कार्यालयात उपलब्ध आहेत. टेंडर फॉर्म ची फी रु.५००/- राहील. इच्छुक टेंडरधारकांनी आपल्या निविदा दि. १४/०७/२०२५ पासून ते दि. २०/०७/२०२५ स.१० ते सायं. ५ वाजेपर्यंत जमा करावेत.
(२) सीलबंद पाकिटावर स्वतःचे पूर्ण नाव, पूर्ण पत्ता व मोबाईल नंबर तसेच **"श्री मार्तंड देवसंस्थान समिती - श्री खंडोबा मंदिर तेल विक्री ठेका"** असे स्पष्ट अक्षरात नमूद करावे.
(३) श्री मार्तंड देवसंस्थान कार्यालयात टेंडर निविदा फॉर्म जमा करतेवेळी अनामत (डिपॉजिट) म्हणून रक्कम रु. १०,००,०००/- (दहा लक्ष मात्र) राष्ट्रीयीकृत बँकेचा मूळ डिमांड ड्राफ्ट जमा करावयाचा आहे. त्याशिवाय टेंडर फॉर्म जमा करून घेतला जाणार नाही. तसेच ज्या व्यक्तीस टेंडर मंजूर होईल, त्या टेंडरधारकाने पहिल्या २ महिन्यांचे तेल ठेक्याचे भाडे राष्ट्रीयीकृत बँकेच्या धनादेशाद्वारे ॲडव्हान्स (आगाऊ) भरावयाचे आहे. टेंडर फॉर्म भरतेवेळी जमा केलेला डिमांड ड्राफ्ट तेल ठेक्याचा संपूर्ण कालावधी पूर्ण होईपर्यंत देवसंस्थानमध्ये जमा राहील. सदरील डिमांड ड्राफ्ट भाड्यामध्ये वर्ग किंवा कोणत्याही कारणास्तव ठेक्याचा कालावधी पूर्ण होईपर्यंत परत केला जाणार नाही.
(४) भाविकांच्या सोई-सुविधांसाठी टेंडरधारकाने स्वतः टेंडर चालवायचे आहे.
(५) ज्या व्यक्तिंची टेंडरमध्ये दरमहा भाडे रक्कम जास्त नमूद असेल त्याच व्यक्तीला तेल विक्री ठेका देण्यात येईल. परंतु जर त्या टेंडरधारकाने जास्त रक्कम नमूद करून टेंडर वाढवून, तेल विक्री ठेक्याचा व्यवसाय करण्यास नकार दिला अथवा टेंडर प्रक्रियेमधून माघार घेतली तर देवसंस्थानकडे अनामत ठेवलेली वरील रक्कम रु.१० लक्ष जप्त करण्यात येईल व ती पुन्हा देण्यात येणार नाही.
(६) टेंडर फॉर्ममध्ये दरमहा ठेक्याची रक्कम अंकी व अक्षरी रक्कम स्पष्ट नमूद करावी.
(७) ज्या टेंडरधारकांची रक्कम जास्त असेल त्या टेंडरधारकाला ठेका देण्यात येईल. ठेका मंजूर झाल्यानंतर त्या टेंडरधारकाने ३ दिवसांत दोन महिन्यांची भाड्याची रक्कम राष्ट्रीयीकृत बँकेच्या धनादेशाद्वारे आगाऊ भरून ठेकेदारीचा नोंदणीकृत लिव्ह अँड लायसन्स करारनामा करून त्यांना वरील व्यवसाय सुरू करावा लागेल.
(८) तेलाचा प्रति वाटी दर रुपये १० प्रमाणे असावा. (सध्याच्या आकाराची तेल वाटीप्रमाणे)
(९) तेल टेंडरधारकाने प्रत्येक दोन महिन्यांस पुढील दोन महिन्यांच्या भाड्याची रक्कम आगाऊ पहिल्या महिन्याच्या ७ तारखेच्या आत देवसंस्थानच्या कार्यालयात नियमितपणे भरावयाची आहे.
(१०) टेंडरधारकाने ११ महिन्यांचा टेंडर कालावधी पूर्ण होण्याअगोदर कोणत्याही कारणास्तव तेल ठेका चालविला नाही तर सदरील अनामत ठेवलेली वरील रक्कम रु. १० लक्ष जप्त करण्यात येईल.
(११) तेल ठेक्याची मासिक रकमेची किमान मर्यादा चालू ठेक्यापेक्षा म्हणजेच रु. ३ लाख १ हजार पेक्षा जास्त असणे अनिवार्य असून तेच टेंडर विचारात घेतले जाईल.
(१२) सदर टेंडरप्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा हस्तक्षेप केल्यास सदर टेंडर अपात्र ठरविण्यात येईल.
(१३) टेंडर निविदा स्वीकारण्याचे, निविदा फोडण्याचे व निविदा मंजूर करण्याचे सर्व अधिकार मा. विश्वस्त मंडळाकडे आहेत.
(१४) सदरील निविदा देवसंस्थानचे अधिकृत संकेतस्थळ **www.khandoba.com** येथे उपलब्ध आहे.

**निविदा जमा करण्याचे ठिकाण**
**श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी**
"मल्हार" भक्तनिवास (दुर्गामाता चौक), जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे

**आशिष मारुती बाठे**
व्यवस्थापक
श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी

**अभिजित अरविंद देवकाते**
प्रमुख विश्वस्त
श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी